# बालशिक्षणाची समुपदेशन केंद्रे कशासाठी

१. गेल्या अनेक वर्षांमध्ये बालकांचे असलेले अनेक प्रश्न वाढत आहेत, नव्याने अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.
२. पारंपारिक शिक्षण, संस्थांतर्गत शिक्षण, दिवसेंदिवस अधिक बंदिस्त होत आहे, त्यातून बालकांचे शिक्षण वाढत्या प्रमाणात तणावग्रस्त होत आहे.
३. बालकांना वाढविण्याच्या आणि त्यांच्या संगोपनाच्या घरांतील पद्धती, बालकांना अनेक ताण निर्माण करताहेत.
४. बिघडते पर्यावरण, स्पर्धात्मकतेच्या जाचक कल्पना, हिंसात्मकता, जीवनवेग, तंत्रज्ञानाचा अल्पवयांतील वापर आणि आणि अशास्त्रीय बालशिक्षणाच्या पद्धती यांमुळे बालकांचे मुक्त विकासवेधी जीवन कुस्करून जात आहे.
५. बाह्य समाजजीवनातील व्यसनाधीनता, चटपटखाद्यसवयी, खेळांच्या घटत्या सोयी, प्रौढांचे अन्यायकारक वागणे इत्यादी अनेक गोष्टी, मुलांवर अनाठायी असह्य अन्याय करीत आहे.
आणि
६. या सर्वांवर उपचार होण्यासाठी, पालक-शिक्षक-समाज यांचे शिक्षण करणाऱ्या, कोणत्याही संस्थात्मक यंत्रणा आज आपल्या जवळपास उपलब्ध नाहीत.

**<u>बालशिक्षण म्हणजे काय</u>** ?

बालशिक्षण हे, बालकांबाबतचे प्रौढांचे शिक्षण असते.

बालकातून प्रौढ निर्माण होत जाणाऱ्या प्रवासाची ही कथा असते. या प्रवासाला बालविकासाचा हेतू असतो. बालकाचे पालन, पोषण आणि शिक्षण या जबाबदाऱ्या प्रेमाने आणि परिपूर्णतेने कशा पेलाव्यात, याच्या पद्धतींचे हे शिक्षण असते. बालविकासाचे शास्त्र हा या पद्धतींमागचा आधार असतो. मुले व त्यांच्याशी संबंधित प्रौढ यांमधील सततचा संवाद हे, बालशिक्षणाचे प्रबळ असे साधन असते. या साधनाचा वापर करून बालविकास कसा साधायचा, याचे ज्ञान आणि याची कौशल्ये आत्मसात करण्याचे प्रयत्न प्रौढांनी करणे, म्हणजेच बालशिक्षण होय.

बालविकास ही निसर्गातील एक अद्‌भुत अशी घटना असते. ती निसर्गनियमांनुसार घडणारी घटना असते. बालकाचा जन्म, त्याचे वाढणे आणि सदैव शिकत जाणे या निसर्गनियंत्रणाने घडणाऱ्या गोष्टी असतात. त्या समजावून घेणे, हा बालशिक्षणाचा प्रमुख आशय असतो.

बालकाचा जन्म आणि त्याचे वाढणे, विकसित होणे या गोष्टी जरी निसर्गदत्त असल्या तरी बालकाचे जगणे, ही समाजांतर्गत घडून येणारी सामाजिक गोष्ट असते. बालक जन्म घेते तेव्हा ते समाजाचा एक घटक बनते. पुढील त्याची वाढ, त्याचा विकास, त्याचे शिकणे या सर्व बाबी समाजजीवनाच्या चौकटीत घडून येत असतात,

समाजाच्या आधारे घडून येत असतात. एका नैसर्गिक व्यक्तीचे रूपांतर सामाजिक व्यक्तीत होण्याचे कार्य, ही समाजाची निर्मिती असते. ज्या क्षणाला आणि जन्मतःच जन्म देणाऱ्या आईशी असलेली नाळ कापली जाते, तेव्हाच समाजाशी नाळ जोडली जाते आणि मग, त्याच्या विकासाची म्हणजेच बालविकासाची सारी जबाबदारी ही संबंधित प्रौढ व्यक्तींची ठरत असते. ही जबाबदारी कशी पार पाडावयाची याचे शिक्षण म्हणजे बालकांबाबतचे प्रौढांचे शिक्षण असते. हेच बालशिक्षण असते.

**<u>विचारासाठी मर्यादा चौकट</u> :**

बालकांची (**वयोमर्यादा**) (०-३, ३-८, ८-१४)

**गरजा**
(बालकांच्या व पालकांच्या)
- शारीरिक
- भावनिक
- बौद्धिक
- सामाजिक
- मेंदूविषयक

**समुपदेशन कोणासाठी**

**शास्त्रीयता** (संशोधनांधारित)
(बालकाची नैसर्गिकरीत्या घडून येणारी वाढ व शिकणे)
संदर्भासहित

**उपयुक्तता** (सुसंगतता)
(राष्ट्रीय शैक्षणिक धोरण)
(बालकांचे हक्क व तत्संबंधी कायदे)
(बालशिक्षणाचे आजचे स्वरूप व स्तर)

**<u>शिक्षणक्रमाची उद्दिष्टे</u> :**

१. बालकांचे आरोग्यपूर्ण शिक्षण यांबाबत शास्त्रीय ज्ञान व कौशल्य प्रौढांना पुरवणे.
२. बालकांशी वागणूक
३. बालकांबाबतचे निर्णय
- बालकांच्या शिक्षणासंबंधी, पालकांसमोर असणाऱ्या दैनंदिन, कौटुंबिक व सामाजिक प्रश्नांच्या सोडवणुकीस सहाय्य करणे, त्यासाठी समुपदेशन करणे.
- शास्त्रीय, आरोग्यपूर्ण बालशिक्षणाचा प्रसार व प्रचार करणे.

**<u>शिक्षणक्रम</u> :**

१ बालकाचा जन्म - जनुकांचा खेळ } आरोग्य - आई व बाळ

२ जन्मपूर्व निगा – गर्भाची, आईची       शिक्षण - बाळाविषयी आईचे

३ तीन वर्षांपर्यंतचे बालक
४ बालकांचा मेंदू–विकास
} बालकाचे आरोग्य, क्षमता, विकास, भाषा व शिकणे यांबाबत पालक प्रबोधन.
मेंदू विकास, बालविकास व बालशिक्षण यांबाबतचे प्रौढांचे शिक्षण.

५ तीन ते सहा या वयांतील बालक
६ घरातील बालक, शाळेतील बालक
} मेंदू विकास, भाषा व अन्य विकासक्षेत्रे, विकासक अनुभव.
पालक, शिक्षक, संस्थाचालक, शासन, गाव, समाज यांचे शिक्षण.


७ घरचे बालशिक्षण
८ शाळेतील बालशिक्षण
९ परिसरातील बालशिक्षण
} मेंदू आधारित, मेंदू पोषक, मेंदू घातक.
शिक्षण व्यवस्था – घर, शाळा, परिसर.
साहित्य, साधने इत्यादी.

१० बालविकास व बालशिक्षण
११ बालकेंद्री समाज
} धोरणे - राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय
कायदे – भारत, महाराष्ट्र

१२ बालविकास
१३ बालशिक्षण
} समस्या व उपाय योजना.
पाश्चात्य व भारतीय इतिहास.
समस्या - उपाययोजना.

१४ समुपदेशन
१५ समुपदेशन व्यवस्था
} व्याख्या, तत्त्वे, सैद्धांतिक भूमिका.
मानसशास्त्र व समुपदेशन पद्धती.
समुपदेशन केंद्रे, त्यांच्या गरजा, व्यवस्था.

बाह्य जोड :



**प्रश्नांचा सांघिक अभ्यास** : ग्रंथातून / संशोधन प्रकल्प

**मुले**

- वयोमानानुसार मुलांचा विकासपथ
- त्यानुसार मेंदू पोषक उपक्रम / कार्यक्रम
- मुलांचे वास्तवातील शिक्षण विषयक प्रश्न
- शालेय शिक्षण : भाषिक माध्यमाचा प्रश्न, शिक्षणातील पद्धतींचा प्रश्न, शाळा व्यवस्थापन – फिया - शिस्त इत्यादी प्रश्न
- धोरणाविषयक प्रश्न

**पालक**

- आर्थिक परिस्थिती – माध्यम - संधी यांमधील सहसंबंध.
- मराठी मुलांचे पालकांना जाणवणारे प्रश्न.
- इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या पालकांना जाणवणारे प्रश्न.
- ग्रामीण व शहरी पालकांच्या भिन्न समस्या.
- समाजातील रूढी, प्रथा, आग्रह यांचे मुलांवर होणारे घातक परिणाम. आणि,
- अन्य अनेक.

❖